खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

## प्रथम वर्ष कला

सेमिस्टर दुसरे

# इतिहास

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन (१९२०-१९५०)

# घटक १ : जन आंदोलन

# अ) असहकार चळवळ

## प्रास्ताविक

गांधीजींचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता.त्यामुळे इंग्रजांशी सहकार्य करण्याची त्यांची भूमिका होती.१९१९ चा कायदा राबविण्यासाठी त्यांनी इंग्रजांना सहकार्य केले.१९२० मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे खास अधिवेशन भरले.या अधिवेशनात गांधींजींनी असहकाराचा ठराव मांडला.गांधीजींनी मांडलेला ठराव पास झाला.इंग्रजांशी सहकार्य करू इच्छिणारे गांधी विरोधी भूमिका का घेतात यास अनेक घटक कारणीभूत ठरले.ते पुढीलप्रमाणे

## असहकार चळवळीची कारणे

### १.रौलट कायदा :

पहिल्या महायुद्ध काळात भारतात नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सुरक्षा कायदा करण्यात आला.महायुद्ध संपल्यावरही कायदा कायम राहिला.उलट भारतीय राष्ट्रवादाला शह देण्यासाठी व क्रांतिकारकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काय करावे हे निश्चित करण्यास रौलट यांच्या अध्यक्षतेत एक समिती नेमली.रौलट यांच्या शिफारशीनुसार ब्रिटिश सरकारने केंद्रिय कायदे मंडळात दोन विधेयके मांडली.

या प्रस्तावित कायद्यानुसार विनाचौकशी अटक अधिकार, कुठेही संशयावरून झडती घेणे अधिकार सरकारला असणार होते.मानवी मुलभूत अधिकारांवर यामुळे गदा येणार होती.भारतात सर्व स्तरातून यास विरोध सुरू झाला.गांधींनीही हे विधेयक पास झाल्यास त्याविरोधात देशपातळीवर आंदोलन करण्यात येईल असे इंग्रजांना कळविले.इंग्रजांनी याकडे दुर्लक्ष केले.१८ मार्च १९१९ रोजी अनार्किकल अँड रिव्हा^ल्युशनरी क्राईम अ^क्ट पास केला.हा कायदा रौलट कायदा म्हणूनही ओळखला जातो.काळा कायदा म्हणून याचा सर्वत्र निषेध सुरू झाला.३० मार्च रोजी या कायद्याच्या विरोधात गांधींनी हरताळ जाहीर केला.

### २.जालियनवाला बाग हत्याकांड :

महायुद्धकाळात लष्कर भरती युद्धखर्च यासाठी पंजाबात मोठा छळ झाला.युद्धसमाप्तीनंतर रौलट ॲक्ट आला.यामुळे पंजाबात मोठा असंतोष उसळला.ले.ग.ओडवायरने असंतोष दडपण्यास डॉ.किचलू व डॉ.सत्यपाल या नेत्यांना कैदेत टाकले.या नेत्यांच्या सुटकेसाठी १०.४.१९ रोजी काढलेल्या मोर्चावर इंग्रजांनी केलेल्या गोळीबारात १५ लोक ठार झाले.यामुळे संतप्त लोकांनी सराकारी इमारतीस आगी लावल्या.फोनच्या तारा तोडल्या.यामुळे ओडवायरने सभा व मोर्चावर बंदीचे फर्मान १२.४.१९ रोजी काढले.अमृतसरमधील सामान्य जनतेस याबाबत माहिती नव्हती.सरकारच्या जुलूमाचा

निषेधासाठी १३.४ रोजी जालियनवाला बागेत सभा भरविण्यात आली.या सभेवर जनरल डायरने २०००० लोकांवर १६०० फैरी झाडल्या.गोळया संपल्या म्हणून गोळीबार बंद केला.१००० लोक ठार झाले.पंजाबात लोकांचा अमानुष छळ ही सुरू झाला.

**३.हंटर कमिशन :**

जालियनवाला हत्याकांडाने सारा देश हादरला.इंग्रजांच्या न्यायबुद्धीवरील गांधीजींचा विश्वास उडाला.टागोरांनीही निषेध करत सर पदवीचा त्याग केला.शंकर नायर यांनी ग.ज.च्या एक्झिक्युटीव्ह कौन्सिल सदस्यत्वाचा त्याग केला.अखेर सरकारने या हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी हंटर अध्यक्षतेत एक समिती नेमली.समितीचा अहवाल सादर होण्यापूर्वीच सरकारने इंडेम्नीटी अ^क्ट पास करून दोषींना माफ केले.डायरला सेवामुक्त केले तर ओडवायरवर काहीच कारवाई करण्यात आली नाही.डायरचा इंग्लडमध्ये २०००० पौंडाची थैली देण्यात आली.यासर्व घटनाक्रमावरून हा सरकारचा पूर्वनियोजित कट होता असे वाटू लागले.त्यामुळे गांधींनी असहकार चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**४.खिलाफत चळवळ :**

पहिल्या महायुद्धात इंग्लंड व तुर्कस्थान एकमेकांच्या विरोधात लढत होते.भारतीय मुस्लिमांपुढे कुणाला मदत करावी हा प्रश्न होता.कारण त्यांच्या राजकीय निष्ठा इंग्लंडशी तर धार्मिक निष्ठा तुर्कस्थानशी निगडीत होत्या.इंग्रजांनी महायुद्धात विजय मिळविल्यावर तुर्की खलिफाच्या सत्तेस धक्का लावणार नाही असे अश्वासन दिले.परंतु महायुद्ध समाप्ती नंतर तुर्की साम्राज्य बळकावले.तुर्कस्थानवर अपमानास्पद तह लादला.यामुळे खलिफाच्या सत्तेस व प्रतिष्ठेस धक्का बसला.यामुळे इंग्रजांचा निषेध करण्यासाठी भारतात मुस्लिमांनी खिलाफत चळवळ सुरू केली.खिलाफत अधिवेशनास गांधी व इतर काँग्रेस नेते हजर होते.खिलाफतीस पाठिंबा देण्यासाठी राजकीय चळवळ उभारावी असे गांधींना वाटत होते.ज्यामुळे दोन समाजामध्ये अधिक दृढ संबंध निर्माण होतील.थोडक्यात खिलाफत चळवळीस पाठिंबा म्हणून असहकार चळवळ सुरू करण्यात आली.

**५.पहिले महायुद्ध :**

१९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरु झाले होते. या युद्धात इंग्रजांमुळे भारत गोवला गेला. युद्धातील सहभागामुळे भारतीय लोक व सैन्यात राष्ट्रवादी भावना जागृत झाल्या होत्या. त्यातच युद्धाचा खर्च इंग्रज भारतीयांकडून वसूल करत होते. आर्थिक पिळवणूक वाढली होती. त्यामुळे चळवळ सुरु करण्यास अनुकूल मानसिकता तयार झाली होती.

## असहकार चळवळ प्रारंभ

गांधीजींनी भारतात छोटे सनदशीर लढे चालविले होते.त्यांचा पहिला देशव्यापी लढा असहकार चळवळ होय.कलकत्ता येथील काँग्रेसच्या खास अधिवेशनात गांधीजींनी असहकाराचा ठराव मांडला. गांधीजींचा सत्याकडे जाणारा मार्ग अहिंसक होता.या मार्गावरील त्यांच्याकडील महत्त्वाचे शस्त्र म्हणजे सत्याग्रह होते.सत्याग्रहाचे अनेक प्रकार आहेत.त्यापैकी एक म्हणजे असहकार होय.कोणत्याही शक्तीचा असहकाराचे शस्त्र वापरून पाडाव करता येतो.

गांधीजींनी मांडलेल्या असहकार ठरावास सी आर दास पा,ल बेझंट मालविय नेत्यांचा विरोध झाला होता.अखेर विरोधानंतरही हा ठराव पास झाला.याचवर्षी १४००० प्रतिनिधींच्या उपस्थितीत २६ डिसेंबर १९२० रोजी नागपूर येथे काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन सुरू झाले.हे अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे ठरले.कलकत्ता अधिवेशनात पास झालेल्या असहकार ठरावावर नागपूर अधिवेशनात विरोधानंतरही शिक्कामोर्तब करण्यात आले.व येथून पुढे भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्त्व एका अर्थाने गांधीजींकडे एकवटले.स्वातंत्र्य चळवळीचे नवे पर्व सुरू झाले.तसेच या अधिवेशनात काँग्रेस बळ वाढविण्यासाठी व ती तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी भाषिक अधारावर काँग्रेसच्या २१ प्रांतिक संघटना निर्माण करण्यात आल्या.

## असहकार चळवळ कार्यक्रम (कलमे)

नागपूरच्या (१९२०) अधिवेशनात असहकार कार्यक्रम मान्य झाला. गांधीजींनी असहकाराचा ठराव पास करून घेताना असहकाराचा सांगितलेला कार्यक्रम पुढील प्रमाणे होता.

१. सरकारी नोकऱ्या व पदव्या मानसन्मान यांचा त्याग करणे.

२. सरकारी सभा समारंभावर बहिष्कार टाकणे.

३. सरकारी शाळा - महाविदयांलयातून मुलांना काढून राष्ट्रीय शिक्षण संस्थांच्या शाळेत दाखल करणे.

४. सरकारी न्यायालयांवर बहिष्कार घालणे व स्थानिक लवाद मंडळात वाद सोडवणे.

५. १९१९ च्या कायद्यानुसार होणाऱ्या प्रांतिक निवडणुकांवर बहिष्कार टाकणे.

६. परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशी मालाचा वापर, पुरस्कार करणे.

७. दारूबंदीचा प्रचार व दारूच्या दुकानांसमोर निदर्शने करणे.

याशिवाय इतर अनेक पूरक उपक्रमही सुचविण्यात आले होते. त्यात प्रातिनिधिक गृहातील सदस्यांनी राजीनामा द्यावा. मेसोपोटेमिया लष्करभरतीवर बहिष्कार घालावा. अस्पृश्यता निवारणासाठी काम करावे. हिंदू मुस्लिम ऐक्य वाढवावे. लो.टिळक यांच्या स्मरणार्थ निधी संकलित करू खादीचा प्रसार करावा याचा समावेश होता.

## असहकार चळवळ वाटचाल

१.८.२० रोजी गांधींनी ग.ज.ला पत्र लिहून आपल्या मागण्या मांडल्या.ग.ज.ने त्यास प्रतिसाद दिला नाही.अखेर गांधींनी असहकाराचा कार्यक्रम हाती घेतला.असहकाराचा कार्यक्रम देताना गांधींजी म्हणाले होते, 'असहकाराचा कार्यक्रम जर सर्व भारतीयांनी कसोशीने अमलात आणला तर ब्रिटिशांना राज्य करणे अवघड होईल.एक लाख गोरे तीस कोटी भारतीयांवर राज्य करतात ही मोठी आश्चर्याची तसेच शरमेची गोष्ट आहे.त्यांचे राज्य शस्त्रावर आधारलेले असले तरी आपण जर त्यांना संपत्ती आणि मनुष्यबळ नाकारले तर त्यांना राज्य करता येणार नाही'.या असहकार कार्यक्रमाने एक वर्षात स्वराज्य मिळेल असा गांधींजींना विश्वास वाटत होता. चळवळ सुरू करताना गांधींनी इंग्रजांकडून मिळालेला कैसर ए हिंद किताब परत केला.टागोरांनी सर पदवीचा त्याग केला होता.नेताजींनी आयसीएस पद सोडले.अनेक विद्याथ्र्यांनी सरकारी शाळा का^लेज सोडून राष्ट्रीय शिक्षण संस्थांत प्रवेश घेतला.सी.आर.दास पं.मोतीलाल नेहरू डा^.राजेंद्र प्रसाद व्ही.व्ही.गिरी वि{लभाई पटेल सरदार पटेल सी राजगोपालाचारी या वकीलांनी वकीली सोडली.

परकीय मालाच्या होळया करण्यात आल्या.परकीय मालाच्या दुकानासमोर निदर्शने करण्यात आली.यामुळे परकीय माल खप कमी हो}न सरकारचा लक्षावधीचा महसुल बुडाला.५० लाख लोक राष्ट्रीय सभेचे सभासद झाले.टिळक फंडात १ कोटीहून अधिक रक्कम गोळा झाली.त्यातून २० लाख चरखे खरेदी करून ते घरोघर दिले.खादी वापराच्या चळवळीस प्रोत्साहन मिळाले.खादी देशभक्तीचे प्रतिक बनले.हिंदु मुस्लिम ऐक्य निर्माण झाले.अस्पृश्यता निवारणाचाही कार्यक्रमही हाती घेण्यात आला.चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविली.शेतकरी कामगारही उत्स्फुर्तपणे चळवळीत सहभागी झाले. स्त्रियांही मोठया संख्येने चळवळीत सहभागी झाल्या. गांधींनी देशभर दौरा केला. त्यांची लोकप्रियता वाढली. त्यांचे नेतृत्त्व सर्वमान्य झाले. १९१९ च्या कायद्यानुसार भारतात स्थापन झालेल्या केंद्रीय कायदे मंडळाच्या उद्घाटनासाठी व भारतीयांचा असंतोष कमी करण्यासाठी प्रिन्स आ^फ वेल्स भारत भेटीवर आले.यावेळी भारतभर हरताळ पाळावा असे काँग्रेसने ठरविले. मुंबईत सर्वस्तरातील लोक त्यात सहभागी झाले.चौपाटीवर गांधीजींची भव्य सभा झाली. सभेनंतर पारशी व अँग्लो इंडियन लोकांवर संतप्त जमावाने दगडफेक केली.

म.गांधीजींनी ला^र्ड रिडिग्जला पत्र पाठवुन संघटना व वृत्तपत्रावरील निर्बंध मागे घे}न सत्याग्रहींची सुटका केल्यास सत्याग्रह थांबविण्याचा विचार करू असे कळविले.परंतु रिडिग्जने याकडे दुर्लक्ष केले.यामुळे चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी गांधीजींनी बार्डोली सत्याग्रहाचा निर्णय घेतला व ते बार्डोलीकडे निघाले.यादरम्यान चौरीचौरा प्रकरण घडले.

## असहकार चळवळ स्थगिती (बंद) स्थगित करण्याचे कारणे

५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील चौरीचौरा गावी लोकांनी मोर्चा काढला होता.या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. यामुळे जमाव संतप्त झाला. पोलिसांनी जवळच्या ठाण्यात आश्रय घेतला असता जमावाने पोलिस ठाणे जाळले. यात एकवीस पोलीस व एक हवालदार यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे चळवळीस हिंसेचे गालबोट लागले. अहिंसेने लढण्याचे मनोधैर्य लोकांमध्ये आलेले नाही म्हणून व्यथीत झालेल्या गांधींनी चळवळ स्थगीत केली. इंग्रज अमानुषपणे चळवळ दडपण्याचाही धोका होता.

बार्डोलीस काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक होऊन त्यात गांधीजींचा निर्णय मान्य करण्यात आला. परंतु चळवळ अशी अचानक थांबविल्याने देशात नैराश्य पसरले.दास नेहरू लाला लजपतराय नेताजींनी गांधीजींच्या निर्णया विरोधात नापसंती व्यक्त केली.

याचवेळी इंग्रजांनी गांधींना अटक केली.राजद्रोहाचा खटला चालवुन त्यांना सहा वर्ष तुरूंगवासाची शिक्षा दिली.फेब्रुवारी १९२४ मध्ये प्रकृती अस्वास्थ्यामुळे गांधींची सुटका झाली.

## असहकार चळवळ अपयशाची कारणे

### १. अनपेक्षित व अचानक स्थगिती

चळवळ अचानक बंद केल्याने लोक व नेते नाराज झाले. एवढया मोठया चळवळीत एखादा हिंसेचा प्रसंग होणारच. असा हिंसेचा प्रसंग होण्यात जशी लोकांची चुक होती तशी ती सरकारचीही होती. सरकारने अनेकदा सत्याग्रहींना अमानुष वागणूक दिली.

### २. धार्मिक प्रश्नाशी सांगड

असहाकार चळवळ राजकीय होती तर खिलाफत चळवळ धार्मिक होती. असहकार चळवळीची सांगड खिलाफत चळवळीशी घालणे त्यामुळेच अनेकांना चुकीचे वाटत होते. तसेच ज्या खलिफा पदासाठी ही चळवळ केली ते पद १९२२ मध्ये तुर्की लोकांनीच संपुष्टात आणले.

### ३. अनेक नेत्यांचा विरोध

राष्ट्रीय सभेच्या (कॉंग्रेस) अनेक नेत्यांचा असहकार चळवळीस विरोध होता. बिपिनचंद्र पाल, लाल लजपतराय, ॲनी बेझंट यांचा सुरूवाती पासूनच असहकार चळवळीला विरोध होता.

### ४. सरकारची अमानुष दडपशाही

असहकार चळवळ अहिंसक होती. तरी शासनाने चळवळ दडपण्यासाठी अमानुष मार्गाचा वापर केला. चळवळीवर लाठीहल्ला गोळीबार करणे चुक होते.

### ५. प्रशिक्षण अभाव

लोकांना सत्याग्रहाचे प्रशिक्षण नव्हते.अशा अनेक कारणांमुळे असहकार चळवळ अपयशी ठरली.

## असहकार चळवळीचे परिणाम व महत्त्व

### १.राष्ट्रीय चळवळीत सामान्य जनता

पूर्वी राष्ट्रीय चळवळ फक्त बुद्धिजीवी व सुशिक्षित वर्गापुरती मर्यादित होती.पण असहाकार चळवळीपासून राष्ट्रीय चळवळ सामान्यांची बनली.खेडयापाडयापर्यंत ही चळवळ जा}न पोहोचली.

### २.राष्ट्रीय सभा कृतीशील

राष्ट्रीय सभेत कोणत्याही प्रश्नाच्या अनुषंगाने वाद चर्चा होत असे.पण चळवळीमुळे सभा पहिल्यांदाच कृतीचे व्यासपीठ बनली.सरकारशी संघर्ष होणार नाही याची काळजी घेतली जाई.पण या चळवळीने आपली मागणी निर्भीडपणे मांडली जा} लागली.

### ३.सरकारची भीती नाही

सरकारशी अहिंसेने व सहनशीालतेने कसे लढावे याचे शिक्षण या चळवळीतून जनतेला मिळाले.सामान्यजनता सरकार पोलीस व तुरूंग यास भीत असे.पण चळवळीने पोलीस व तुरूंगाची भीती संपविली.लाठीमार सहन करत हजारो लोक तुरूंगात जाण्यास तयार राहू लागले.लोकांना तुरूंगात ठेवण्यास सरकारकडे जागा नव्हती व लोक घरी जाण्यास तयार नव्हते असे ही प्रसंग घडले.

### ४.स्वराज्याची मागणी

सभेने सुरूवाती पासून इंग्रजांकडे लहान सहान मागण्या केल्या होत्या.पहिल्यांदा त्यांनी स्वराज्याची मागणी चळवळीद्वारे केली,.स्वराज्य ध्येय दृढ झाले.सामान्य जनताही त्यासाठी तयार झाली.आपल्या लढयाचे अंतीम उद्दीष्ट काय हे लोकांना स्पष्टपणे समजले.अर्ज विनंत्यांद्वारे छोटया मोठया सुधारणांसाठी तगादा करण्याचा कालखंड संपुन सभा कृतीचे व्यासपीठ बनली यामुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागून लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

### ५.विधायक कार्यक्रम

बंगाल फाळणीनंतरच्या चळवळीपासून राष्ट्रीय भावना दिवसेंदिवस वाढत होती.स्वराज्य व बहिष्कार तसेच अनेक विधायक कार्यक्रम तळागाळापर्यंत पोहोचले होते.असहकार चळवळीत घरोघरी लाखो चरखे फिरू लागले.स्वदेशी कापड निर्मितीस चालना मिळाली.दारूबंदी व अस्पृश्यता निवारण कार्यक्रमांनीही जोर धरला.

### ६.नवे नेते व कार्यकर्ते निर्माण

शाळा कोर्ट यावरील बहिष्कार हे चळवळीचे मुख्य अंग होते.अनेक लोकांनी आपली वकीली सोडली.देशसेवेचे व्रत घेतले.पूर्वी राजकारण फुरसतीचा विषय होता आता तो देशप्रेमाचा भाग झाला.

**७.पदव्या मानसन्मानाचे आकर्षण नाही.**

सरकारने दिलेल्या पदव्या व मानसन्मानाची पदके असहकार चळवळीत अनेक हिंदी लोकांनी परत केली.अशा पदव्या व मानसन्मानाबद्दल सामान्यांच्या मनात आदर राहिला नाही.आपल्याला लुबाडणा-या लोकांकडून पदव्या मिळणे देशद्रोह मानला जाऊ लागला.

अशा प्रकारे असहकार आंदोलन अपयशी ठरले असले तरी त्याने भारतीय स्वातंत्र्य लढयास नवी दिशा दिली व भविष्यातील लढयाची पायाभरणी केली.

# ब) सविनय कायदेभंग चळवळ

### प्रास्ताविक

महात्मा गांधीजीनी १९२० मध्ये असहकार चळवळ सुरु केली. परंतु चळवळीला हिंसक वळण लागल्याने असहकार चळवळ १९२२ मध्ये स्थगित करण्यात आली. गांधीजींना अटक झाली. चळवळ एकदम भरत असताना बंद केल्याने भारतीय राजकारणात एक पोकळी निर्माण झाली. यावेळी पं. मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास यांनी १९२३ च्या निवडणुकात भाग घ्यायचा निर्णय घेतला त्यानुसार मार्च १९२३ मध्ये अलाहाबाद येथे स्वराज्य पक्ष स्थापन केला. स्वराज्य पक्षाने भारतीय राजकारणात निर्माण झालेली पोकळी भरून काढली. प्रभावी काम करत निवडणुकीत चांगले यशही मिळविले. पण अल्पावधीत हा पक्ष मागे पडला. १९१९ च्या कायद्याचा पुनर्विचार करण्यासाठी सायमन कमिशन भारतात आले. सायमन कमिशनवर भारतीयांनी बहिष्कार घातला. सायमन गो बॅक म्हणत लोकांनी कमिशनचा निषेध केला.

भारताची भावी राज्यघटना कशी असावी हे निश्चित करण्यासाठी त्याचा आराखडा पंडीत मोतिलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. त्यास नेहरू रिपोर्ट म्हणतात. तो सरकारला सादर (जुलै १९२८) केला. या अहवालात वसाहतींच्या राज्याचा दर्जा, धर्मनिरपेक्षता आणि मुलभूत अधिकार, संयुक्त मतदारसंघ, केद्रिय कार्यकारीनी, केंद्रिय संसद, प्रांतासाठी सोयी, संस्थानिकांसाठी शिफारस, सर्वोच्च न्यायालय, मुलकी व लष्करी अधिका - यांचा दर्जा या गोष्टी समाविष्ट होत्या. सरकारने याकडे दुर्लक्ष केले.

गांधीजीनी शासनाबरोबर तडजोड करण्यासाठी अकरा मागण्या सादर केल्या. संपूर्ण दारूबंदी, अर्धा शेतसारा माफी, मीठ कर रद्द, लष्करी खर्च निम्मा करणे, देशी मालास संरक्षण व राजकीय कैद्यांची मुक्तता अशा ११ मागण्या गांधीजीनी केल्या होत्या. सरकारने या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्याच्या पार्श्वभूमीवर सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली.

### लाहोर अधिवेशन व चळवळीचा ठराव

कॉग्रेसचे लाहोर अधिवेशन १९२९ मध्ये झाले. या ऐतिहासिक अधिवेशनाचे अध्यक्षपद पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी भूषविले. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत करण्यात आला. ३१ डिसेंबर १९३१ रोजी रावी नदीच्या काठी भारतीय स्वातंत्र्याचा ध्वज फडकविण्यात आला. २६ जानेवारी १९३० हा दिवस पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्याचे ठरले. याच अधिवेशनात सविनय कायदेभंगाचा ठराव करण्यात आला.

## सविनय कायदेभंग म्हणजे काय ?

जर शासन - शासक जुलमी असेल, अन्यायी असेल तर अशा शासनाच्या आज्ञा व कायदे पाळण्यास नकार द्‌यायचा. त्याबाबतची पूर्वसूचनाही सरकारला द्‌यायची. आणि महत्त्वाचे म्हणजे कायदा मोडला म्हणून सविनय त्याबाबतची शिक्षा हि स्वीकारावयाची. तसेच हा प्रतिकार अहिंसात्मक मार्गाने करावयाचा. या भूमिकेनुसार सुरु करण्यात आलेल्या चळवळीस सविनय कायदेभंग म्हणतात.

## सविनय कायदेभंग सुरुवात

कॉंग्रेसला पूर्ण स्वातंत्र्य हवे होते. इंग्रज त्याबाबत उदासीन होते. तरी गांधीजीनी तडजोडीसाठी प्रयत्न केले. पण इंग्रजांनी किमान मागण्यांकडे ही दुर्लक्ष केल्याने अखेरीस गांधीजींना चळवळ सुरु करण्याचा निर्णय घ्यावा लागला. लाहोर अधिवेशनात सविनय कायदेभंग ठराव पास होऊन त्याबाबतचे नेतृत्व व सर्वाधिकार गांधीजींकडे सोपविण्यात आले होते. महात्मा गांधीजींनी १४ फेब्रुवारी १९३० रोजी सविनय कायदेभंग सुरु करण्याचा आदेश दिला आणि चळवळ सुरु झाली.

## सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याची कारणे

### १. सायमन कमिशन

भारतीय प्रश्नाबाबत सायमन कमिशन आले पण त्यात एकही भारतीय नव्हता. त्यामुळे या कमिशनला भारतीयांचा तीव्र विरोध होता त्यातच कमिशनने भारतीयांची स्वराज्याची मागणी फेटाळली. त्यामुळे कमालीचा असंतोष वाढून सरकार विरोधी चळवळीस अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

### २. नेहरू रिपोर्ट व महात्मा गांधीजींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष

नेहरू रिपोर्ट मध्ये साम्राज्यांर्गत स्वराज्य मागणी केली होती. हि मागणी करताना कॉंग्रेस मध्ये वाद झाले होते. त्यावेळी जर शासनाने एक वर्षात ही मागणी मान्य केली नाही तर संपूर्ण स्वातंत्र्यासाठी चळवळ सुरु करण्याचे ठरले होते. सरकारने नेहरू रिपोर्ट सादर करून एक वर्ष होऊनही त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यातच गांधीजीनी तडजोडीसाठी केलेल्या अकरा मागण्या ही मान्य केल्या जात नव्हत्या. त्यामुळे चळवळ सुरु करण्यात आली.

### ३. आर्थिक मंदी व दयनीय स्थिती

अमेरिकेत आलेली मंदी जगभर पसरली होती. त्यामुळे भारतीय शेतीवर त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले होते. चलनवाढ व संप यातून प्रश्न अधिक बिकट बनत चालले होते. इंग्लंडच्या हितासाठी भारतीय उत्पादन व बाजारपेठ वापरली जात होती. भारतीयांच्या

शोषणात वाढ झाली होती. मंदीतून सावरण्यासाठी काहीच उपाय केले जात नव्हते. साहजिकच त्यामुळे चळवळीस अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. चळवळ केल्याशिवाय सरकार जागे होणार नाही असे लोकांना वाटू लागले होते.

### ४. मजूर पक्ष

इंग्लंडमध्ये निवडणुका झाल्या. हुजूर पक्षाचा पराभव झाला मजूर पक्ष सत्तेवर आला. तुलनेने मजूर पक्ष उदार होता. मजूर पक्षाला भारतीय प्रश्नाबाबत सहानुभूती होती. तरी भारताच्या भावी राज्यघटनेबाबत आयर्विन कोणतीही मागणी मान्य करत नव्हते. त्यामुळे आवश्यक सुधारणा मिळविण्यासाठी चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम

महात्मा गांधीजीनी सविनय कायदेभंगचा आदेश देताना काय करायचे आहे याबाबतही सांगितले होते. दांडीस जाताना जागो जागी केलेल्या भाषणातूनही याबाबत मार्गदर्शन केले. गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळीचा सांगितलेला कार्यक्रम खालीलप्रमाणे होता...

१. मिठाचा सत्याग्रह करणे.

२. जंगल कायदा भंग करणे.

३. सरकारला कर न देणे.

४. निवडणुका व सरकारी समारंभ यावर बहिष्कार घालणे.

५. सरकारी शिक्षण संस्थां, सरकारी नोकरी, न्यायालयावर यावर बहिष्कार घालणे.

४. परदेशी माल, दारू, अफू विकणाऱ्या दुकानांवर निदर्शने करणे.

### सविनय कायदेभंग चळवळीची वाटचाल

### दांडी यात्रा

चळवळ सुरु करण्यापूर्वी गांधीजीनी इंग्रजांना ज्या मागण्या केल्या होत्या त्यात मिठावरील कर रद्द करावा या मागणीचा समावेश होता. मीठ जीवनावश्यक व निसर्गात मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने त्यावर निर्बंध (भारतीयांच्या मिठागारावर) डोईजड कर असू नयेत. अशी गांधीजींची भूमिका होती. त्यामुळे चळवळ सुरु करताना मिठाचा कायदा मोडावा असे ठरले. मिठाचा सत्याग्रह हा प्रतीकात्मक होता. मिठाच्या सत्याग्रहाने एका अर्थाने सविनय कायदेभंग चळवळीस सुरुवात झाली. मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी गांधीजीनी गुजरातमधील सुरत जिल्ह्यातील दांडी हे ठिकाण निश्चित केले. साबरमती आश्रमातून १२ मार्च १९३० रोजी दुपारी ७२ अनुयायांसह गांधीजीची यात्रा सुरु झाली. पंडित खरे, गणपतराव गोडसे, विनायकराव, केशव गोविंद हरकरे, अवंतिकाबाई गोखले, जमनलाल बजाज, बाळासाहेब खेर, बांदेकर, स का पाटील, हरिभाऊ मोहनी, दत्ताजी ताम्हणी या सह १३ महाराष्ट्रीयन

लोकांचा या यात्रेत सहभाग होता. साबरमती ते दांडी अंतर ३८५ कि.मी. (२०० मैल) आहे. प्रवासात गावोगावी गांधीजींची भाषणे झाली. निर्भयपणे कायदेभंग करण्याचे आवाहन गांधीजी करत असत. प्रवास करताना अनेक कार्यकर्तेही यात्रेस येऊन मिळत होते. ५ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडीस पोहोचले. या यात्रेसाठी गांधीजींना २४ दिवस लागले. दुसऱ्या दिवशी (६ एप्रिल १९३०) दांडी समुद्रकिनाऱ्यावरील मीठागरावर गांधीजीनी मुठभर मीठ उचलून मिठाचा कायदा मोडला. देशभर असाधरण उत्साह निर्माण झाला. देशभर कायदेभंग सुरु झाला. बेकायदा मीठ तयार करुन विक्री करत जागोजागी मिठाचा कायदा मोडण्यास सुरुवात झाली.

**धारासना सत्याग्रह**

चळवळ दिवसेंदिवस प्रभावी होत होती. सरकारने चळवळ आटोक्यात आणण्यासाठी दडपशाहीचा मार्ग अवलंबला. ४ मे रोजी महात्मा गांधीजींना अटक करण्यात आली. तरी चळवळ सुरु राहिली. गुजरातमधील धारासना येथे मिठाच्या सत्याग्रहाचे नियोजन करण्यात आले होते. अब्बास तय्यबजी यांना अटक केल्या मुळे या लढ्याचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले. जवळपास तीन हजार सत्याग्रही या लढ्यात सहभागी झाले. सरकारने या सत्याग्रहीवर लाठीहल्ला केला. हा हल्ला सहन करत लढा सुरु ठेवण्यात आला. एक तुकडी जखमी झाली की दुसरी तुकडी पुढे येत असे. या लढ्यात सत्याग्रहीनी दाखविलेली सहनशीलता व निग्रह कौतुकास्पद आहे. दांडी, धारासना प्रमाणेच अनेक ठिकाणी मिठाचा कायदा मोडण्यात आला. बंगाल, ओरिसा, तामिळनाडू भागातही मिठाचे सत्याग्रह झाले. महाराष्ट्रात मुंबई, वडाळा, मालवण, शिरोडा येथील मिठाचे सत्याग्रह प्रसिद्ध आहेत. समुद्रकिनाऱ्यावर नसलेल्या गावातही इतर जुलमी कायदे मोडत चळवळ वाढत राहिली.

**सोलापूरचा लष्करी कायदा**

६ मे १९३० रोजी सोलापूर येथील चळवळीत हरताळ पाळून मोर्चा काढण्यात आला. या मोर्चावर जिल्हाधिकारी आदेशाने गोळीबार झाला. या गोळीबारात अनेकांना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे संतप्त जनतेने शासकीय इमारतीवर हल्ले केले. सरकारने सोलापुरात लष्करी कायदा (मार्शल लॉ) लागू केला. या सत्याग्रहातील नेते मल्लाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे यांना फाशी देण्यात आली. अमानुषपणे सोलापूर सत्याग्रह दडपण्यात आला.

**पेशावरचा सत्याग्रह**

वायव्य सरहद्द प्रांतातील खान अब्दुल गफारखान यांना सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाते. खान यांची खुदा इ खिदमतगार ही संघटना होती. ती लाल डगलेवाले नावानेही ओळखली जात असे. महात्मा गांधीजीनी कायदेभंगाचा आदेश दिल्यावर या संघटनेने २३

एप्रिल १९३० रोजी पेशावर ताब्यात घेऊन सत्याग्रह सुरू केला. सरकारला दडपशाही साठी लष्कर बोलवावे लागले. या गढवाल फलटणने सत्याग्रहीवर गोळीबारास नकार दिला.

## जंगल सत्याग्रह

अनेक इंग्रज कायदे अन्याय्यी जुलमी होते. लोकांनी जेथे जो जुलमी कायदा मोडणे शक्य असेल तो कायदा मोडण्यास सुरुवात केली. इंग्रजांनी कायदा करून जंगलावर स्वत:ची मालकी प्रस्थापित केल्याने परंपरेने जंगलावर गुजराण करणाऱ्या लोकांची अडचण झाली. त्यामुळे विशेषत: आदिवासी मोठ्याप्रमाणावर दुखावले गेले. साहजिकच जंगल सत्याग्रहात आदिवासीचा सहभाग मोठा होता. भारतात ७० हजार पेक्षा जास्त ठिकाणी जंगल सत्याग्रह झाला. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आला. महाराष्ट्रातील बिळाशी (सातारा), संगमनेर (अहमदनगर), कळवण (नाशिक), चिरनेर, पुसद सत्याग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. बिळाशी सत्याग्रहातील राजुताई कदम यांचे धैर्य कौतुकास्पद होते तर पुसदला १० जुलै १९३० रोजी बापुजी आणे यांनी गवत कापून जंगल सत्याग्रह केला.

## झेंडा सत्याग्रह

कायदेभंग चळवळ विविध मार्गांनी व पद्धतीने सुरु होती. या चळवळीत तिरंगा लोकांच्या मनामध्ये चैतन्य निर्माण करणारा ठरला. इंग्रज विरोधाला न जुमानता भारतीय स्वातंत्र्याचे प्रतिक तिरंगा फडकविण्यास सुरुवात झाली. सरकारी इमारतीवर तिरंगा फडकविण्यात येऊ लागला. लहान मुले तिरंग्यासारखा पोशाख करू लागली. ध्वजाच्या सन्मानासाठी अनेकांनी हौतात्म्य पत्करले. त्यांच्या या कार्यामुळे चळवळीस प्रेरणा मिळू लागली.

## परदेशी माल बहिष्कार व बाबू गेनू

चळवळीत परदेशी मालावर बहिष्कार घालण्याचा मार्गही अवलंबण्यात आला. परदेशी मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांनाही अडविण्यात येऊ लागले. मुंबईत असा सत्याग्रह सुरु असताना गिरणी कामगार बाबू गेनू सैद पोलिस बंदोबस्तात असलेल्या परदेशी मालाच्या ट्रक समोर आडवे झाले. ट्रक त्यांच्या अंगावरून गेला. बाबू गेनू यांचे हे बलिदान भारतीयांसाठी मोठे प्रेरणादायी ठरले.

## सरकारची दडपशाही

चळवळ दिवसेदिवस अधिक प्रभावी होत असल्याने सरकार ती दडपण्यासाठी मोठ्याप्रमाणावर प्रयत्न करत होते. त्यासाठी अमानुष पद्धतीचा वापर करत होते. निशस्त्र सविनय मोर्चावर लाठीहल्ला, गोळीबार करत होते. स्त्रियांवरही हल्ले केले जात होते. या हल्ल्यांचे लाखो निरपराध लोक बळी ठरले. नेत्यांना कैद करून चळवळ संपविण्याचा प्रयत्न

झाला. १६ एप्रिल १९३० रोजी पंडीत नेहरूंना अटक करण्यात आली. ४ मे १९३० रोजी महात्मा गांधीजींना अटक करून येरवडा येथे ठेवण्यात आले. सत्याग्रहीना अटक करण्याचा मार्गही सरकार चोखाळत होते. जवळपास ६० लाख लोकांना अटक करण्यात आली होती.

**गांधी आयर्विन करार व गोलमेज परिषद -** सविनय कायदेभंग चळवळ सुरु असताना इंग्लंड मध्ये गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. या पहिल्या गोलमेज परिषदेत कॉंग्रेस व गांधीजींच्या अनुपस्थितीत होते. त्यांच्या शिवाय भारताबद्दल निर्णय घेणे शक्य होणार नाही याची इंग्रजांना जाणीव झाली. त्यामुळे व्हॉईसरॉय आयर्विन यांना सूचना देऊन महात्मा गांधीजीबरोबर चर्चा करण्यात आली. त्यातून गांधी आयर्विन करार झाला. हा करार ५ मार्च १९३१ रोजी झाला. या करारानुसार मिठावरील निर्बंध रद्द करावे. राजकीय कैदी मुक्त करावे. जप्त मालमत्ता परत कराव्यात. विदेशी माल व दारू दुकानासमोर शांततामय निदर्शनास परवानगी मिळावी. कॉंग्रेसने गोलमेज परिषदेत भाग घ्यावा व सविनय कायदेभंग चळवळ मागे घ्यावी असे ठरले.

महात्मा गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेत सहभागी झाले. या परिषदेत भारताच्या भावी राज्यघटनेपेक्षा जातीय प्रश्नावरच चर्चा होऊन मतभेद झाले. स्वतंत्र मतदारसंघ गांधीजींना अमान्य असल्याने ते भारतात परतले. दरम्यान आयर्विन यांच्या साम्राज्यवादी विलिंग्डन व्हॉईसरॉय झाला. भारतात सामान्य जनतेवर मोठे अत्याचार सुरु होते. शेतकरी चळवळ करत होते. परिस्थिती बिघडत होती. सरकार दडपशाहीच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचू नये म्हणून वृत्तपत्रांवर निर्बंध लादत होते. त्यामुळे गांधीजीनी पुन्हा चळवळ सुरु केली

**सविनय कायदेभंग चळवळीचा दुसरा टप्पा व अखेर -** गांधीजीनी ३ जानेवारी १९३२ रोजी पुन्हा कायदेभंग चळवळीस सुरुवात केली. सरकारने कॉंग्रेस बेकायदेशीर ठरविली तरी कॉंग्रेसने दिल्लीस अधिवेशन भरविले. चळवळ जशी वाढत होती तशी सरकारची दडपशाहीही वाढत होती. त्यातच भारताला अंतर्गत स्वायत्तता देण्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे वैयक्तिक सत्याग्रह सुरु ठेऊन चळवळ मागे घेण्यात आली.

### सविनय कायदेभंग चळवळीचे महत्त्व व परिणाम

#### १. संपूर्ण स्वातंत्र्याकडे

कायदेभंग चळवळीत अंतिम उद्दिष्ट संपूर्ण स्वातंत्र्य हेच होते. कॉंग्रेस साम्राज्यातर्गत स्वराज्याची अपेक्षा आयर्विन यांच्या करत होती. पण आयर्विन त्याबाबत आश्वासनही देऊ न शकल्याने भारतीयांचा भ्रमनिरास झाला. त्यातून आत्ता संपूर्ण स्वातंत्र्यच मिळवायचे या हेतूने प्रयत्न सुरु झाले. लाहोर अधिवेशनात त्याबाबतचा ठरावही पास करण्यात आला. साहजिकच भविष्यातील सर्व चळवळीचे अंतिम उद्दिष्ट स्पष्ट होऊन त्यादिशेन वाटचाल सुरु झाली.

#### २. देशभक्तीस उधाण व एकात्मता

या चळवळीत लोकांचा उत्साह मोठा होता. चळवळकाळात तर देशभक्तीला उधान आले होते. लोक उत्साहाने स्वयंस्फूर्तीने लढ्यात सहभागी होत होते. सर्व स्तरातील, वर्गातील लोक देशभक्तीने भारावले होते. कायदेभंग चळवळ मुस्लीमविरोधी असल्याचा जीनांनी प्रचार

करूनही मुस्लीम मोठ्या संख्येने चळवळीत सहभागी झाले. अनेकांनी तुरुंगवासही भोगला. खुदाई खिदमतगार संघटनेचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. या चळवळीत जसे सर्व जाती धर्माचे लोक सहभागी झाले तसे सर्व वर्गातील लोकही सहभागी झाले. शेतकऱ्यांची संख्याही मोठी होती. सरकार शेती जप्त करत होते तरी शेतकरी चळवळीत सहभागी होत होते. चळवळीचा उद्देश स्वातंत्र्याबरोबर एकात्मता हा ही होता व तो साध्य झाला.

### ३. देशभर विस्तार

कायदेभंग चळवळ १९३० मध्ये सुरु झाली. तर १९३२ मध्ये चळवळीचा दुसरा टप्पा सुरु झाला. या एकूण काळात ही चळवळ देशभर पसरली. असहकार चळवळीपेक्षा कायदेभंग चळवळीचा विस्तार मोठा होता. पूर्वांचल राज्यातही चळवळ पसरली होती. वायव्य सरहद्द प्रांतात तर चळवळीत मोठा उत्साह होता.

### ४. स्त्रियांचा सहभाग

कायदेभंग चळवळीचा प्रादेशिक विस्तार मोठा होताच पण या चळवळीत सहभागी लोकांची संख्याही अधिक होती. भारतीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या यापूर्वीच्या कोणत्याही लढ्यात एवढे लोक सहभागी झाले नव्हते. स्त्रियाही यापूर्वी एवढ्या मोठ्या संख्येने लढ्यात सहभागी झाल्या नव्हत्या. कमलादेवी चट्टोपाध्याय, उर्मिला देवी, सरोजिनी नायडू, कमाल नेहरु, हेमप्रभादास, अवंतिकाबाई गोखले, हंसबेन मेहता, स्वरुपराणी नेहरू, कमला नेहरू यांनी चळवळीत सक्रिय भाग घेतला.हंसबेन मेहतानी ऑनररी मॅजिस्ट्रेट पदस सोडून चळवळीत भाग घेतला होता.बंगालमध्ये उर्मिला देवीनी 'नारी सत्याग्रह समिती' स्थापुन सत्याग्रह केला होता.अनेक स्त्रियांनी या चळवळीत नेतृत्व केले होते.

### ५. इंग्रजांचे आर्थिक नुकसान

कायदेभंग चळवळीत विविध मार्गांचा वापर झाला. त्यापैकी बहिष्कार, परदेशी माल होळी, परदेशी वस्तू दुकांनावर निदर्शने यामुळे आयात मोठ्याप्रमाणावर कमी झाली. कापड व्यवसायाला मोठा फटका बसला. मॅचेस्टरमधील गिरण्या बंद पडल्या.७५ टक्के कापड व्यवसाय बुडाला. तर भारतीय उद्योगांना चांगले दिवस आले. इंग्रजांच्या भारतीयांवरील आर्थिक अवलंबीत्वाची जाणीव झाली. थोडक्यात मंदावलेली आयात व कर संकलनात झालेली घट यामुळे इंग्रजांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागले.

### ६. इंग्रज व त्यांच्या कायद्याची भीती नष्ट

शासनाबद्दल पूर्वी लोकांच्या मनात खूप भीती होती. सरकारच्या तुरुंगाची भीती व दंडशक्तीचा आदर होता. चळवळ काळात सविनय अहिंसात्मक मार्गाने चाललेल्या सत्याग्रहावर शासन लाठीहल्ला, गोळीबार करू लागले. सत्याग्रहीना अटक करू लागले. हे शासनाचे

अन्याय्य धोरण लोकांच्या लक्षात येऊ लागले. तरुंगाची व सरकारी कायद्याची लोकांना भीती वाटेनाशी झाली. लोक निर्भयपणे चळवळीत सहभागी होऊ लागले. देशासाठी तुरुंगात जाणे अभिमानाची गोष्ट झाली.

**७. कॉंग्रेसचे व महात्मा गांधीजींचे महत्त्व वाढले**

सरकार मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याने कायदेभंग चळवळ सुरु झाली. चळवळ प्रभावी होणार नाही. लवकरच चळवळीचा जोम कमी होईल. विविध आश्वासन देत आपण चळवळीत फुट पडू शकतो. कॉग्रेसचे महत्त्व कमी करू शकतो असे इंग्रजांना वाटत होते. त्यांनी गोलमेज परिषद भरविली पण कॉग्रेसच्या सहभागाशिवाय तिला अर्थ नाही हे त्यांच्या लक्षात आल्याने आयर्विन यांना गांधीजींशी करार करावा लागला. यामुळे भारतातील स्वातंत्र्य चळवळीतील कॉग्रेस व गांधीजींचे महत्त्व अधोरेखित झाले.

# क) चले जाव चळवळ

**प्रास्ताविक**

१९३० मध्ये म. गांधींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. साधारण १९३५ नंतर कायदेभंग चळवळीचा जोम ओसरला. १९३५ मध्ये भारत सरकारचा कायदा पास झाला. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले. इंग्लंड बरोबर भारतही युद्धात गोवले गेले. या काळातच भारतात मोठे जन आंदोलन सुरु झाले. ते आंदोलन चले जाव, छोडो भारत चळवळ किवा ऑगस्ट क्रांती नावने ओळखले जाते.

**चले जाव चळवळीचा ठराव**

चले जाव चळवळीचा मसुदा सेवाग्राम येथे (जुलै १९४२) तयार करण्यात आला होता. कॉंग्रेस कार्यकारी समितीने त्यास अंतिम स्वरूप दिले. चळवळीचे नियम व निर्णय विषयक अधिकार महात्मा गांधीजींना देण्यात आले होते. या मसुद्यास वर्धा ठराव म्हणतात. या चळवळीच्या स्वरूपावरून मुंबई शहराचे महापौर युसुफ मेहेर अली यांनी चले जाव हि घोषणा तयार केली. भारतीय कॉंग्रेसच्या महासमितीने 'चले जाव' या घोषणेस मान्यता दिली.

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टॅंक मैदानावर ऐतिहासिक सभा झाली. त्यावेळी मौलाना अबुल कलाम आझाद कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. या सभेत आझाद, नेहरू व पटेल यांच्यानंतर महात्मा गांधीजी यांनी भाषण केले. गांधीजीनी इंग्रजांना चले जाव म्हणत संपूर्ण स्वराज्यासाठी चळवळ सुरु केली. संपूर्ण देशभर चले जाव चळवळ सुरु झाली. त्यामुळे गोवालिया टॅंक मैदानाला ऑगस्ट क्रांती मैदान म्हणतात. गांधीजींच्या करा किंवा मरा या संदेशाने आंदोलनाची सुरुवात झाली.

**चले जाव चळवळ सुरु करण्याची कारणे**

**१. असमाधानकारक क्रिप्स योजना**

बिघडत चाललेल्या युद्ध परिस्थितीमध्ये भारतीयांना शांत करून सहकार्य मिळविण्यासाठी इंग्लंड केवळ भारतीयांचे प्रश्न सोडविण्याचा देखवा करत होते. इंग्लंडने क्रिप्सच्या अध्यक्षतेत एक समिती भारतात पाठविली. या समितीने एक योजना मांडली.|पण क्रिप्स योजना भारतीयांचे समाधान करू शकळी नाही. त्यामुळे साहजिकच सर्व स्तरातून या योजनेस विरोध सुरु झाला. क्रिप्स योजनेतून समाधान न झाल्याने चळवळी शिवाय दुसरा पर्याय राहिला नाही व कॉंग्रेसने चळवळ सुरू केली.

**२. संपूर्ण स्वातंत्र्याची ओढ**

भारतीयांच्या मनात इंग्रज राजवटीविषयी प्रचंड तिटकारा निर्माण झाला होता. पूर्ण स्वातंत्र्याशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट भारतीयांचे समाधान करू शकणार नव्हती. तर इंग्रज स्वातंत्र्य देण्यास राजी नव्हते. आपल्या नंतर येथे राज्य चालविण्याची क्षमता कुणामध्ये नाही असा प्रचार त्यांनी चालविला. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळ करूनच मिळवावे लागेल हे लक्षात आल्याने चळवळ सुरु करण्यात आली.

### ३. जपानी आक्रमणाचा धोका

जपानने सिंगापूर मलेशिया व ब्रह्मदेश इंग्लंड कडून जिंकून घेतले. साहजिकच जपान भारतावरही आक्रमण करणार कारण येथे इंग्रजांची सत्ता आहे. तसेच इंग्रज भारताचे संरक्षण करण्यास असमर्थ आहेत. म्हणून इंग्रजांनी येथून निघून गेले पाहिजे इंग्रज येथून गेल्यास जपान आक्रमण करणार नाही असे गांधीजींचे मत बनले त्यामुळे त्यांनी चळवळ सुरु केली.

### ४. इंग्रजांचाकडून अपमानास्पद वागणूक

पूर्व बंगालात इंग्रज दडपशाहीचा कहर झाला. तेथील शेतकऱ्यांची जमीन लष्करी कारणासाठी बळकावण्यात आली. तेथील लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. तसेच जपानने म्यानमार काबीज केल्याने तेथून परतलेल्या भारतीयांनी परतताना इंग्रजांनी भारतीय व युरोपियनांनमध्ये केलेल्या भेदभावाची माहिती दिली त्यामुळे इंग्रजविषयक चीड अधिकच वाढली. त्यामुळे चळवळीस अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली

### ५. वाढती महागाई, बेकारी व चलनाचे अवमूल्यन

दुसऱ्या महायुद्धामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आला होता. इंग्रज सरकार दुसऱ्या महायुद्धात खूप खर्च करत होते. इंग्रज हितसंबंधासाठी भारतीय तिजोरी खाली होत होती. वाढीव खर्च भागविण्यास इंग्रज नवे कर लादत होते. तसेच युद्धकाळात अनेक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला होता.त्यामुळे महागाईचा भडका उडाला. चलनाचे अवमूल्यन झाले. लोकांचा नोटांवर विश्वास राहिला नाही. यासर्व दुरावस्थेस इंग्रज जबाबदार असल्याने सामान्य जनतेचा इंग्रज विरोध तीव्र होत गेला व त्यांच्या विरोधात चळवळ सुरु करण्याची मानसिकता तयार झाली.

### ६. महात्मा गांधीजींची व्यवहारनीती

हिंसक घटनेमुळे त्यांनी १९२२ मध्ये असहकार चळवळ स्थगित केली होती. महात्मा गांधीजी अहिंसेचे कट्टर पुरस्कर्ते होते. काळाच्या ओघात देशपातळीवर चळवळ चालविताना काही हिंसक घटना घडू शकतात. याची जाणीव गांधीजींना झाली. इंग्रजांच्या शिस्तबद्ध अराजकापेक्षा ते गेल्यावर येणारी अराजकता वाईट असणार नाही असे गांधीजींचे मत बनले. त्यामुळे त्यांनी करेंगे या मरेंगे अशी घोषणा देत चळवळ सुरु केली.

**(इतर कारणे : राष्ट्रीय सभेच्या मागण्या / जनतेची सत्याग्रहाची तयारी / युद्धास विरोध / इंग्लंडचा प्रचार / नेताजी सुभाषचंद्र बोस यांची भूमिका)**

### चले जाव चळवळीची वाटचाल

### नेत्यांना कैद व जनतेची चळवळ

महात्मा गांधीजीनी चळवळीची घोषणा केली. चळवळ दडपण्यासाठी इंग्रजांनी अनेक नेत्यांना कैद केले. महात्मा गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, आचार्य नरेंद्र देव अशा अनेक नेत्यांना इंग्रजानी कैद केले. गांधीजींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये तर पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य नरेंद्र देव यांना अहमदनगर येथील किल्ल्यात ठेवण्यात आले. राजेंद्र प्रसाद, आचार्य कृपलानी, असफअली, गोविंद वल्लभ पंत व अनेक इतरही अनेक नेत्यांना अटक करण्यात आली. नेत्यांना अटक केल्यास चळवळ आटोक्यात येईल असे इंग्रजांना वाटत होते. परंतु चळवळ थांबली नाही. चळवळ खऱ्या अर्थाने जनतेची झाली. ज्याला जसे जमेल तसे त्याने चळवळीत स्वयंस्फूर्तीने योगदान देण्यास सुरुवात केली.

### स्थानिक नेतृत्वाचा कस

राष्ट्रीय प्रादेशिक पातळीवरील नेत्यांना इंग्रजांनी कैद केली. तरी चळवळ सुरु राहिली. लॉक स्वयंस्फूर्तीने चळवळीत भाग घेत होते. या लोकांना मार्ग दाखविणे व प्रोत्साहन देण्याची जबाबदारी साहजिकच स्थानिक व उदयोन्मुख नेत्यावर येऊन पडली. त्यांनीही ही चळवळ अधिकाधिक व्यापक होण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

### लढ्याचे विविध मार्ग व सरकारची दडपशाही

लोकांना स्वातंत्र्य मिळेपर्यंत लढायचे होते. त्यासाठी प्राणार्पणाची तयारी होती. स्वत:ला उमजेल जमेल तसे किवा स्थानिक नेत्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार चळवळ विविध पद्धतीने सुरु राहिली. शासकीय कार्यालयाची (पोस्ट, रेल्वे, तहसील) जाळपोळ करणे, सरकारी खजिना लुटणे, रस्ते अडविणे, टेलीफोन तारा तोडणे, रेल्वेरूळ उखडणे अशा विविध मार्गांचा वापर करत सरकारचे नुकसान करण्यात येऊ लागले.

तर सरकारही अमानुषपद्धतीने चळवळ दडपण्यासाठी प्रयत्नशील होते. लाठीमार, गोळीबार, अटकसत्र, अत्याचार जेथे जे जमेल ते इंग्रज करत होते. हजारो लोकांना कैद केले तर हजारो लोकांना गोळीबारात आपला जीव गमवावा लागला. यासाठी इंग्रजांनी लष्कराचाही वापर केला.

### भूमिगत चळवळ

उघडपणे चळवळीत भाग घेता येत नसल्याने भूमिगत राहून चळवळ चालविण्यात अनेक नेत्यांनी योगदान दिले. हे नेते अगदी दुर्गम भागातही जाऊन पोहोचले. त्यांच्या बरोबर चळवळही पसरली. भूमिगत नेत्यांनी एकत्र येऊन मध्यवर्ती समिती स्थापन केली होती. या समितीने चळवळीचे कार्यक्रम दिले. त्यानुसार पथके तयार करून पत्रके छापणे, रेडीओ चालविणे, इंग्रज संदेशवहन यंत्रणा उध्वस्त करणे अशी कामे करण्यात आली. एका भागातील चळवळीच्या वाटचालीची माहिती इतर भागातील भारतीयांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कामही करण्यात आले. जयप्रकाश नारायण, डॉ.राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, सुचेता कृपलानी, सानेगुरुजी, एस. एम. जोशी यांनी भूमिगत राहून केलेले कार्य फार मोलाचे होते जयप्रकाश नारायण यांच्या 'स्वातंत्र्य लढ्यात भाग घेणाऱ्या सर्व सैनिकांसाठी' पुस्तकाचे प्रकाशनही याच काळात झाले.

### काँग्रेस रेडीओ

उषा मेहता यांनी चले जाव चळवळकाळात आपल्या सहकाऱ्यांसह गुप्त रेडिओ सुरू केला. जव्हेरी बंधु, गिल्डर, राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन यांची मोलाची मदत मिळाली. हा रेडिओ १४ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू केला. उषा मेहता यांच्या आवाजात या रेडिओवरील पहिले प्रसारण झाले. इंग्रजांनी पकडू नये म्हणून रेडिओ दररोज आपली जागा बदलत असे. या रेडिओवरून महात्मा गांधीजीसह अनेक नेत्यांचे संदेश प्रसारीत केले जात. (हा रेडीओ ऐंशी दिवस सुरु होता.) तीन महिन्यांनतंर सरकारला हे केंद्र सापडले. उषा मेहता व सहकाऱ्याना (विठ्ठल जव्हेरी) यांना अटक करण्यात आली व त्यांना तुरूंगवासाची शिक्षा देण्यात आली. कॉंग्रेस रेडीओ बंद पडला पण त्यापासून प्रेरणा घेऊन पुणे, कलकत्ता व नेपाळजवळ अशी रेडीओ केंद्रे सुरु झाली.

### प्रती सरकार

चले जाव चळवळ काळात लढ्याचे विविध मार्ग पुढे आले. या चळवळ काळात अनेक ठिकाणी इंग्रजी शासन यंत्रणा कोलमडली होती. तसेच आपण कारभार करण्यास समर्थ आहोत हे ही भारतीयांना दाखवून द्यायचे होते. त्यातून अनेक ठिकाणी प्रती सरकार निर्माण करण्याचा प्रयोग यशस्वी झाला. लोकांनी इंग्रजांना चले जाव म्हणताना आपल्या प्रदेशाचा कारभार स्वत:कडे घेतला. इंग्रज प्रशासनाला समांतर प्रशासन उभे केले. प्रती सरकार स्थापन केली. हि प्रतीसरकारे दोन वर्षापेक्षा जास्तकाळ टिकली. प्रती सरकार स्थापन करण्याचे मिदनापूर (बंगाल), पुनिया भागलपूर (बिहार), बालिया (उत्तरप्रदेश), बस्ती (मद्रास), भिमाव्रम (आंध्रप्रदेश) व सातारा (महाराष्ट्र) येथील प्रयोग विशेष गाजले व परिणामकारक ठरले. मिदनापूर सरकार न्यायविषयक कामासाठी प्रसिद्ध झाले. महाराष्ट्रात सातारा परिसरात

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मार्गदर्शनात प्रती सरकार स्थापन करण्यात आले. हे प्रतीसरकार पत्रीसरकार म्हणून प्रसिद्ध पावले. सातारा परिसरातील इंग्रज अधिका-यांना हुसकावून स्वातंत्र्य सैनिकाची कारभार चालविणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली. कोल्हापूर व औंधसह दक्षिणेतील संस्थानांनी या सरकारला मदत केली. किसन वीर, डी.जी.लाड, नागनाथ आण्णा नायकवडी, यशवंतराव चव्हाण यांनी यांचे नेतृत्व या सरकारला मिळाले. तुफान सेना व आझाद सेना स्थापन करून सैन्य व गुप्तचर विभागाचे काम करण्यात आले.

**चले जाव चळवळ अपयशाची कारणे**

इंग्रजांविरुद्ध भारतीयांनी चले जाव चळवळ सुरु केली. भारतीय इतिहासातील ही अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. परंतु या चळवळीस मुख्य ध्येय स्वातंत्र्य मिळविण्यात अपयश आले. इंग्रजांना भारतातून घालावीत आले नाही. ही चळवळ अपयशी ठरली त्यास अनेक घटक कारणीभूत ठरले ते पुढीलप्रमाणे ...

**१. नियोजनचा व कार्यक्रमाचा अभाव**

चळवळीची घोषणा झाली व नेते कैदेत अडकले. चळवळीचा कार्यक्रम स्पष्ट नव्हता. तसेच तो लोकांपर्यंत पोहोचला ही नव्हता. युद्धकाळात नेत्यांना कैदेत टाकले जाईल असे वाटत नव्हते त्यमुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास काय करायचे याचे नियोजन नव्हते. चळवळ कशी करावी त्याला कशी दिशा द्यावी याबाबतचे नियोजन नव्हते. इंग्रजाची दडपशाही, पोलीस कारवाई व कठोर नियंत्रणामुळे चळवळीत एकसूत्रीपणा व उघडपणे कार्य करणे अवघड झाले. तसेच संदेशवहन वहन यंत्रणेचा अभाव होता. तर इंग्रजांकडे चळवळ विरोधात साधने व सर्व प्रकारचे बळ उपलब्ध होते. साहजिकच त्यामुळे चळवळ अपयशी ठरली.

**२. सरकारची दडपशाही**

इंगज सरकार अडचणीत होते. महायुद्धात त्यांना भारतीयांच्या मदतीची नितांत आवश्यकता होती. पैसा, साधन सामग्री व मनुष्यबळ सर्वच बाबतीत इंगज भारतीयांवर अवलंबून होते.त्यामुळे या गोष्टी अव्याहतपणे मिळाव्यात यासाठी येथे स्वतःचे नियंत्रण कायम रहावे म्हणून त्यांनी अमानुष मार्गही निवडले. प्रचंड दडपशाही करत सत्ता टिकविण्यास पर्यंत केले. साहजिकच नेत्यांच्या अभावात या दडपशाहीस संयमाने तोंड देण्याची मानसिकता व धीर सामान्य लोकांकडे असणे शक्य नव्हते. त्यामुळे चळवळ अपयशी ठरली.

**३. नेत्यांना कैद**

८ ऑगस्ट १९४२ रोजी चळवळीची घोषणा झाली. लगेच इंग्रजांनी **ऑपरेशन ज़ीरो ऑवर** योजनेनुसार ९ ऑगस्ट रोजी पहाटेच महात्मा गांधीजी व अनेक नेत्यांना अटक केली. महात्मा गांधीजींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये ठेवण्यात आले. तर पंडित नेहरू, मौलाना आझाद,

सरदार वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, आचार्य नरेंद्र देव यांना अहमदनगर येथील किल्ल्यात ठेवण्यात आले. इतरत्रही अनेक नेते कैदेत अडकले. साहजिकच नेतृत्वच नसल्याने चळवळीची परिणामकारकता कमी होऊन चळवळ अपयशी ठरली.

**४. विविध पक्षांचा विरोध**

चळवळ यशस्वी व्हायची तर सर्व गट, पक्ष एकत्र येणे अपेक्षित होते. परंतु साम्यवादी पक्षाने चळवळीस विरोध केला. महायुद्धात साम्यवादी रशिया व इंग्रज एकाच गटात असल्याने इंग्रजांना मदत केली पाहिजे अशी भूमिका घेत साम्यवादी पक्षाने चळवळीस विरोध केला. मुस्लीम लीगनेही स्वतःच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी व चळवळ हिंदूचे वर्चस्व प्रस्थापित करणारी आहे असा समज निर्माण करत विरोध केला. हिंदू महासभेने अखंड भारताचा नारा देत चळवळीस विरोध केला. भा व अकाली दल यांचा चळवळीस विरोध होता.

**५. अनेकांची सरकारला मदत**

चळवळ काळात इंग्रजांची अडचण होती. सर्वांनी एक दिलाने चळवळ चालविली असती तर यश मिळाले असते. पण चळवळकाळात सरकारी अधिकारी, कर्मचारी, पोलीस व बहुसंख्य संस्थानिक यांनी सरकारला मदत करण्याची भूमिका घेतल्याने सरकारी कामकाज व्यवस्थित सुरु राहून चळवळ अपयशी ठरली

**६. दुष्काळ**

१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले. त्यात याकाळात भारतातही दुष्काळ पडला. बंगालातील दुष्काळाची तीव्रता मोठी होती. उपासमारीमुळे लाखो लोकांना आपला जीव गमवावा लागला. त्यातच युरोपातून भारतात येणारी आयात बंद झाल्याने अनेक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. साहजिकच जीवित टिकविण्याचेच मुख्य आव्हान लोकांसमोर उभे राहिल्याने चळवळीचा जोम कमी झाला.

**चले जाव चळवळीचे महत्त्व व परिणाम**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील सर्वाधिक महत्त्वाची चळवळ म्हणून चले जाव चळवळ ओळखली जाते. चले जाव चळवळ स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सुरु झाली. चळवळीला आपले ध्येय गाठता आले नाही. असे असले तरी हि चळवळ स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील शेवटची मोठी चळवळ आहे. या चळवळीने ध्येयपूर्ती जरी झाली नसली तरी स्वातंत्र्य जवळ आले त्यामुळे ही चळवळ अत्यंत महत्वाची आहे. चळवळीचे महत्व व परिणाम पुढीलप्रमाणे ...

**१. ध्येयावर एकमत (संपूर्ण स्वातंत्र्य)**

चळवळ सुरु झाली. चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींकडे सोपविण्यात आले. अनेकांचा गांधीजींच्या नेतृत्वाला, विचारला व कार्यपद्धतीला विरोध होता. अनेकांना सद्यस्थितीत चळवळ सुरु करू नये असे वाटत होते. पण तरी चळवळीत गांधीजींचे नेतृत्व मान्य करण्यात आले. चळवळ सुरु करण्यात आली. कारण या चळवळीत 'स्वातंत्र्य' हे अंतिम ध्येय असल्याचे व त्याशिवाय इतर कशावरच समाधान होणार नाही हे निश्चित झाले.

**२. अपूर्व व्यापकता**

चले जाव चळवळ व्यापकतेच्यादृष्टीने आत्तापर्यंतची सर्वात व्यापक चळवळ होती. शहरी भागाबरोबरच चळवळ ग्रामीण भागातही पसरली होती. नेते नव्हते, लोकांना त्यांना जमेल, झेपेल, आवडेल तसा कार्यक्रम राबविण्याची संधी होती. त्यामुळे चळवळ वेगाने पसरली. त्यातच भूमिगत राहून कार्य करणारे नेते ग्रामीण भागात पोहोचले व त्यांच्या बरोबर चळवळीची माहिती, पद्धती व प्रोत्साहन ग्रामीण भागास मिळाले. साहजिकच शहरी व ग्रामीण तसेच नेता ते सामान्य माणूस सगळे चळवळीशी जोडले गेल्याने चळवळ व्यापक झाली.

**३. जनजागृती व जनआंदोलन**

चले जाव चळवळ आत्तापर्यंतच्या चळवळीतील सर्वात प्रभावी चळवळ होती. लोकांमध्ये आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत जागृती निर्माण झाली. इंग्रज शासनाचा दुहेरी चेहरा लोकांच्या लक्षात आला. इंग्रजांची भारतीय स्वातंत्र्याबद्दल असलेली अनास्था समजली. राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेमुळे सामान्यांना चळवळ हाती घेण्याची संधी मिळाली. चळवळीचे लोक चळवळीत (जना आंदोलनात) रुपांतर झाले.

**४. राष्ट्रवाद, धैर्य व उत्साह**

इंग्रज सरकार व प्रशासनाबद्दल सामान्य नागरिकांमध्ये भीती होती. महात्मा गांधीजीनी उभारलेल्या चळवळीमुळे लोकांच्या मनात असलेली शासनाबद्दलची भीती संपुष्टात आली चळवळीने लोकांमध्ये मोठा उत्साह निर्माण केला. पोलीस, तुरुंग याबद्दलची लोकांची मानसिकता बदलून लोक अटक झाली तरी चालेल पण चळवळीत सहभागी व्हायचेच या विचारापर्यंत पोहोचले. राष्ट्रवादी विचारांचा प्रसार झाला. राष्ट्रवादी भावनेमुळे चळवळीतील सहभाग मोठ्या प्रमाणवर वाढला. डॉ.राजेंद्र प्रसाद म्हणतात, या आंदोलनामुळे जनतेतील धैर्य आणि ब्रिटिशांशी दोन हात करण्याची हिंमत वाढली हे चले जाव आंदोलनाचे फलित होय.

**५. शेवटचे आंदोलन / इंग्रजांना जाणीव**

चळवळीमुळे लगेच स्वातंत्र्य मिळाले नाही. पण भारतीयांना आपले ध्येय पक्के समजले. स्वातंत्र्याबद्दलच्या भारतीयांच्या तीव्र भावना इंग्रजांच्या लक्षात आल्या. आज जरी नसले तरी लवकरच भारतीयांना स्वातंत्र्य द्यावे लागेल हे इंग्रजांना समजले. अनेक ठिकाणी

तर चळवळ दडपण्यासाठी दिलेले शासनाचे आदेश पोलीस व लष्कराने झुगारले होते. साहजिकच आपल्याला येथे फार काळ राहता येणार नाही याची इंग्रजांना जाणीव झाली. परिणामी अल्पावधीत भारतीयांना स्वातंत्र्य ही मिळाले.

(**इतर मुद्दे - प्रश्न जागतिकस्तरावर / नौदल उठाव / स्त्रियांचा सहभाग**)

# ड) क्रांतिकारी चळवळ

## प्रास्ताविक

१८५७ च्या उठावानंतर ही अनेक ठिकाणी सशस्त्र उठाव झाले.या सशस्त्र क्रांतिकारकांनी कट्टर राष्ट्रवादी विचारातून स्वातंत्र्यासाठी सशस्त्र मार्गांनी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी १९२० पूर्वी अनेक संघटना निर्माण झाल्या.अभिनव भारत, अनुशीलन समिती, युगांतर समिती व गदर पक्ष या त्यापैकी काही प्रसिद्ध संघटना आहेत.आद्यक्रांतिकारक वासुदेव बलवंत फडके, चाफेकर बंधु, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अशा अनेक प्रखर राष्ट्रवादी नेत्यांनी १९२० पूर्वी या क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले. त्यांच्या प्रेरणेतून पुढेही ही चळवळ विस्तारत व प्रभावी होत गेली.

## क्रांतिकारी चळवळीची कारणे

१८५७ च्या उठावातून मिळालेली प्रेरणा, काँग्रेसवरील अविश्वास, नैसर्गिक आपत्ती, इंग्रजांचे वर्तन, आर्थिक शोषण, वंगभंग, वृत्तपत्रांचे कार्य, भारतात सुरू झालेले प्रबोधन व इंग्रजी भाषेमुळे वैचारिक जागृतीस मिळालेली गती व विचारांची देवाण घेवाण आणि जपानकडून रशियाचा झालेला पराभव व इतर आतंराष्ट्रीय घटनांच्या प्रभावातून क्रांतिकारी चळवळ सुरू झाली.

## क्रांतिकारकांचा कार्यक्रम

- ब्रिटीश राजवटीविषयी लोकात द्वेषाची भावना निर्माण करणे.
- तरूणांना शिस्त व शस्त्र चालविण्याचे शिक्षण देणे.
- शस्त्र देशातच गुप्तपणे तयार करणे व गरज पडल्यास बाहेरून आणणे.
- क्रांतीकार्यासाठी श्रीमंतांवर दरोडे घालून पैसा उभारणे.
- देशभक्ती गीते व शूर ऐतिहासिक नायकांचे महत्त्व सांगत स्वाभीमान निर्माण करून देशासाठी बलीदान करणारी पिढी निर्माण करणे.

या प्रमाणे क्रांतिकारी चळवळीचा कार्यक्रम होता.

## १९२० ते १९४७ काळातील क्रांतिकारी चळवळ

भारतात अनेक ठिकाणी आक्रमक राष्ट्रवादातून क्रांतिकारी संघटना स्थापन झाल्या. त्यांनी स्वातंत्र्यासाठी कार्य केले. त्यांना ध्येय गाठण्यात यश आले की अपयश यापेक्षा त्यांच्या कार्यातून मिळालेली प्रेरणा महत्त्वाची होती. विविध संघटनांनी या कार्यात मोलाची भर

घातली. आपापल्या क्षेत्रात विस्तारानुरूप क्षमतेनुरूप कार्य केले. अशा अनेक संघटनांपैकी हिंदूस्थान सोशालिस्ट रिपब्लीक असोसिएशन एक महत्वपूर्ण संघटना आहे.

### काकोरी प्रकरण

कानपूरला झालेल्या क्रांतिकारकांच्या बैठकीत शस्त्रासाठी पैसा गोळा करण्यास सरकारी खजिना, शासकीय बँका, कार्यालये, कोषागार व पोस्ट कार्यालये लुटण्याचे ठरले. त्यानुसार पोस्टाचा जमा पैसा रेल्वेने जाणार होता. लखनौ ते सहारनपूर मार्गावर लखनौपासून आठ मैल अंतरावर असलेल्या काकोरी या गावाजवळ (९ ऑगस्ट १९२५) क्रांतिकारकांनी रेल्वेतील खजिना लुटण्याची योजना आखली. योजनेनुसार काकोरी जवळ क्रांतिकारक खजिना घेऊन जंगलात निघून गेले. ही बातमी देशभर गाजली.क्रांतिकारकांना मोठा निधी मिळाल्याने त्यांना शस्त्र खरेदी करणे शक्य झाले. इंग्रजांना यामुळे मोठा धक्का बसला.त्यांनी देशभर क्रांतिकारकांची धरपकड सुरु केली.अटक केलेल्या क्रांतिकारकांवर खटला भरला.काकोरी खटल्याचे कामकाज एप्रिल १९२७ पर्यंत चालले. यामधील रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्लाखान, रोशनलाल व राजेंद्रनाथ लाहिडी यांना फाशीची, चौघांना आजन्म हद्दपारीची व अन्य क्रांतिकारकांना तुरुंगवासाची शिक्षा फर्मावण्यात आली. मुख्य आरोपी असलेले चंद्रशेखर आझाद ब्रिटिशांना गुंगारा देऊन भूमिगत राहिले.

### हिंदूस्थान सोशालिस्ट रिपब्लीक असोसिएशन

चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव, ब्रह्मदत्त, विजयकुमार सिन्हा, सुरेंद्र पांडे, यशपाल, भगवतीचरण व्होरा, महावीर, शार्दुलसिंह सोहनसिंह व राजगुरू असे जवळपास ६० क्रांतीकारक ८ ऑगस्ट १९२८ रोजी दिल्लीस पुराना कीला येथे जमले. त्यांनी हिंदूस्थान रिपब्लीक असोसिएशनचे नामांतर हिंदूस्थान सोशालिस्ट रिपब्लीक असोसिएशन असे केले. चंद्रशेखर आझाद हे संघटनेचे सेनापती होते. तर आग्रा येथे त्यांचे मुख्य कार्यालय होते. देशपातळीवर कार्य करणारी ही संघटना होती.

### सॉडर्सचा वध व असेब्लीत बॉम्बस्फोट

सायमन कमीशनला देशभर विरोध होत असताना पंजाबात लाला लजपतराय नेतृत्त्वात कमीशनला विरोध सुरू होता. तेव्हा इंग्रजांच्या लाठीहल्ल्यात जखमी झालेल्या लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी १७ डिंसेबर १९२८ रोजी सॉडर्सला ठार केले. आझाद, भगतसिंग, सुखदेव, जयगोपाळ व राजगुरूंनी ही योजना आखली होती. ८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग, बटुकेश्वर दत्त यांनी असेब्लीत बॉम्बस्फोट घडविला. त्यांच्यावर लाहोर कट खटला चालविण्यात आला. त्यात ३८ व्यक्तींना फाशी ५८

जणांना जन्मठेप तर ५८ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना फाशी देण्यात आली.

## आझादांचे हौतात्म्य व क्रातिकारी चळवळीची वाटचाल

२७ फेब्रुवारी १९३१ रोजी आझाद पोलीसांबरोबर झालेल्या चकमकीत हुतात्मा झाले संघटनेच्या कार्यकर्त्यांनी बॉम्ब हल्ले, खुन या मार्गांनी शासनास जेरीस आणले. आझादांनंतर यशपाल यांनी संघटनेची सूत्रे सांभाळली. त्यांना १९३२ ते ४३ या कालावधीत कैद भोगावी लागली. अशा प्रकारे या संघटनेने आपल्या कार्याने इंग्रजांनाही सळोकी पळो करून सोडले होते.

## मीरत प्रकरण (मीरत कट खटला)

भारतात १९२० नंतर कामगार चळवळ वाढत गेली. त्यावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. तो रोखण्यासाठी सरकारने समाजवादी नेत्यांना कैद केले. मीरत येथील परिषदेत या नेत्यांच्या ब्रिटिश सरकार नष्ट करण्याचा कट रचल्याचा आरोप ठेवण्यात आला. श्रीपाद अमृत डांगे हे त्यापैकी एक नेते होते. १९२९ ते १९३३ कालावधीत हा खटला चालला. २७ क्रांतीकारकांना यात शिक्षा झाली. हा खटला मीरत कट खटला म्हणून प्रसिद्ध आहे.

## चितगाव प्रकरण

बंगालमधील चितगाव येथील शस्त्रागारावर हल्ला करण्याची योजना क्रांतिकारक सूर्यसेन, अजय घोष व त्यांच्या सहका-यांनी आखली. त्यानुसार ६५ क्रांतिकारकांनी १८ एप्रिल १९३० रोजी शस्त्रागारांवर हल्ला करून तेथील शस्त्रे व दारुगोळा लुटला. सरकारशी लढा देण्यास सुरुवात केली. दळणवळण यंत्रणा बंद पाडली. या प्रकरणातील क्रांतिकारकांना अटक होऊन त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. हा खटला चितगाव कट खटला म्हणून प्रसिद्ध आहे. इंग्रजांनी सूर्यसेन यांच्यासह त्यांच्या १४ सहका-यांना फाशीची शिक्षा दिली. तर कल्पना दत्त व काही क्रांतीकारकांना जन्मठेपेची शिक्षा झाली.हे प्रकरण खूप गाजले व भारतीयांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम या क्रांतिकारकांनी केले.

## क्रातिकारी चळवळीचे मूल्यमापन

क्रांतिकारकांना आपले स्वातंत्र्य हे ध्येय गाठता आले नाही. भारतात विविध भागात स्थापन झालेल्या क्रांतिकारी संघटनांचे स्वातंत्र्य हे मुख्य उद्दिष्ट होते. सशस्त्र मार्गाने त्यासाठी त्यांनी कार्य केले. पण आपले ध्येय गाठण्यात ही चळवळ अपयशी ठरली. त्यास अनेक घटक कारणीभूत ठरले. ब्रिटिशांची कार्यक्षम यंत्रणा, काही स्वकीयांची फितुरी, सामान्यांसाठी अवघड मार्ग, आर्थिक व कौटुंबिक मोहपाश, देशव्यापी एकाच संघटना व शस्त्र प्रशिक्षण अभाव, या काळातील महात्मा गांधींची लोकप्रियता यामुळे ही चळवळ मागे पडत

गेली.असे असले तरी चळवळीचे महत्त्व कमी नाही.अनेकांना शिक्षा होऊनही चळवळ नष्ट झाली नाही. सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेनेचे कार्यही क्रांतिकारकांच्या इतिहासातील महत्त्वाचे कार्य होय.क्रांतिकारी चळवळीमुळेच इंग्रजांना भारतीय मागण्या व प्रश्नांबाबत गांभीर्याने विचार करावा लागला. त्यांच्या शासनाला क्रांतीकार्यामुळे धक्का बसला. क्रांतिकारकांनी जगाला इंग्रज शासनाचे पाशवी जुलमी रूप दाखविले. इंग्रजांना साम्राज्य सोडावे लागणार याची जाणीव करून दिली. स्वातंत्र्य मिळवता आले नसले तरी क्रांतीकार्यामुळे ते जवळ आले. त्यांच्या बलीदानातून सामान्य जनतेस प्रेरणा मिळाली. चीड व असंतोष वाढीस लागला. राजकीय जागृतीस हातभार लागला त्यामुळेच सनदशीर चळवळ प्रबळ बनण्यास मदत झाली. अर्थात वध करून स्वातंत्र्य मिळणार नाही याची क्रांतिकारकांना जाणीव होती. पण त्यातून निर्माण होणारी जागृती व प्रेरणा महत्त्वाची होती. त्यांच्या कार्यास विचारांचा आधार होता. थोडक्यात १९२० नंतरही भारतीय स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिकारी चळवळीचा वाटा मोठा महत्त्वपूर्ण आहे.